# गोखरू

*Tribulus terrestris* L. Family – *Zygophyllaceae*



**विविध भाषांमधील नावे:**

इंग्लिश: Devil´s-Thorn, आसामी: गोक्षरु, हिंदी: गोखरू, मल्याळम: मुलुरिंगी, मराठी गोखरू

**Morphology:**

*Tribulus terrestris* is an annual plant in the caltrop family (Zygophyllaceae) widely distributed around the world. It is adapted to grow in dry climate. It is native to warm temperate and tropical regions in southern Eurasia and Africa. It has been unintentionally introduced to North America and Australia. An aggressive and hardy invasive species, T. terrestris is widely known as a noxious weed because of its small woody fruit – the bur – having long sharp and strong spines which easily penetrate surfaces, such as bare feet or thin shoes of crop workers and other pedestrians, the rubber of bicycle tires, and the mouths and skin of grazing animals.

**वनस्पतीचे वर्णन:**

उष्ण, कोरडया, कमी पूस पडणार्या प्रदेशात गोखरू हि जमिनीवर पसरत वाढणारी, रोपवर्गीय वनस्पती आहे. शेतात, ओसाड, पडीक जमिनीवर हि तण म्हणून सर्वत्र आढळते. गोखरू ते तण असले तरी ती महत्वाची औषधी वनस्पती आहे. तिला वर्षभर फुले व फळे येतात.

**खोड**: पसरत वाढणारे, केसाळ, फांद्या अनेक बारीक केसाळ, लवयुक्त.

**पाने**: संयुक्त, समोरसमोर ५ ते ८ सेंमी लांब, संमुख जोडीतील एक पान लांबीने दुसर्यापेक्षा आखूड, पर्निकेच्या ४ ते ८ जोडया ८ ते १२ मि.मी. लांब, पर्निकांचे देठ अगदी लहान, पणाला उपपर्नाची जोडी. पर्नाक्षावर टोकाला पानांचा आकार लहान-लहान होतो. पर्निकांच्या खालील बाजूला दाट लव व कळाकडील भाग विषम विभागी.

**फुले**: पिवळी, नियमित १ ते १.५ सेंमी. व्यासाची, पानांच्या बगलेत, विरुद्ध बाजूला, एकांडी, पुष्पकोश ५ दलांनी बनलेला आहे.पाकळ्या रुंद ५. पुंकेसर १०. बीजांड कोशाखाली चक्ती १० भागांनी बनलेली. बीजांडकोश पाच कप्पी, परागाधारणी आकाराने मोठी, ५ भागांनी बनलेली.

**फळे**: गोलाकार, पंचकोनी, ५ कप्पी. प्रत्येक कप्पीवर काट्यांच्या २ जोडया. एक जोडी लांब, एक लहान, फळांवरील काटे तीक्ष्ण, फळांच्या प्रत्येक कप्प्यात अनेक बिया. गोखरूची फळे नेहमी पायांना, कपड्यांना, जनावरांच्या शरीराला, वाहनांच्या चाकांना चिकटतात.

**बहर येण्याचा कालावधी :** एप्रिल ते ऑक्टोबर



**औषधी उपयोग:**

मूळ व फळ औषधात वापरतात. मूळ बारीक, चिवट, १०ते १२ सेंमी. लांब, गोलाकार, फिकट उदी रंगाचे असते. त्यास थोडासा सुगंध असून, रुची तूर्त असते. गोखरूचे मूळ दशमुळातील एक घटक आहे. गोखरू स्नेहन, वेदनास्थापन, संग्राहक व बल्य आहे. गोखरू शीतल असून उत्तेजक आहे. गोखरुची फळे मुत्राच्या विकारांवर अत्यंत उपयोगी आहेत. फळांचा काढा संधिवातावर आणि मूत्राशयाच्या विकारावर उपयोगी आहे. मूत्रपिंडाच्या दुबळेपणात पाण्यात धने, जिरे, गोखरू समप्रमाणात घेऊन कुटून, उकळवून गर करून घेतल्यास मुत्रप्रवृत्ती सुधारते. मुत्रापिंडास ताकद देखील येते. गर्भाशयाची शुद्धी होऊन वांझपण नाहीसा होण्यासाठी गोखरू वापरतात. धातुविकार व प्रदर या विकारांवर गोखरुची फळे तुपात तळून त्याचे चूर्ण करून गाई चे तूप व खडीसाखर घालून देतात.

**लागवड :**

बियांपासून रोपे तयार करून लागवड केली जाते.